बांधिलकी गुणवत्तेशी

हिन्दुस्तान फीड्स

HINDUSTAN FEEDS MFG. CO. SATARA • BARAMATI • SHRIRAMPUR Quality Seal

# हिन्दुस्तान सरकी पेंड

## चांगली गुणवत्तापुर्ण प्रत, प्रमाणित वजन, भेसळ विरहीत

## खातरीशीर सरकी पेंड

### पशुखाद्य क्षेत्रातील एक विश्वसनीय नाव 'हिन्दुस्तान फीड्स'

खास ग्राहकांच्या आग्रहास्तव 'हिन्दुस्तान फीड्स' सरकी पेंड वितरण सुरु केले आहे. सदरची सरकी पेंड योग्य मानकानुसार बनवून घेतली आहे. सरकी पेंडीबाबत ग्राहकांमध्ये अनेक समज प्रचलित आहेत. प्रत्यक्षात वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे. तरी ग्राहकांनी सर्व बाबींचा विचार करुन सरकी पेंडीचा योग्य प्रमाणातच वापर केल्यास दुग्धव्यवसायात तो फायदेशीर ठरेल. सरकी पेंडीमध्ये प्रथिने, तेल आणि लिंट असते. चांगल्या प्रतीच्या सरकी पेंडीमध्ये जास्त प्रथिने, जास्त तेल व कमी लिंट असते. अशाप्रकारच्या सरकी पेंडीचे दर कमी असले तरच ती फायदेशीर ठरते. सरकी पेंड कितीही प्रमाणात दिली तरी हे संतुलित खाद्य नाही तो जनावरांच्या आहारातील एक भाग असु शकतो.

| अ.नं. | समज | वस्तुस्थिती |
|---|---|---|
| १ | सरकी पेंडीचे मोठे तुकडे चांगले असतात. | सरकी पेंडीच्या तुकड्याच्या आकारावर गुणवत्ता अवलंबून नसते. उलट मऊ सरकी पेंडीमध्ये तेलाचे प्रमाण अधिक असू शकते. अशी सरकी पेंड मऊ असल्याने तिचे लहान तुकडे होतात. |
| २ | सरकी पेंडीचे तुकडे जाड असल्यास ती चांगली असते. | खूप जाड सरकी पेंडीमध्ये इतर पदार्थांची भेसळ असण्याची शक्यता दाट असते यासाठी सरकी पेंडीची जाडी मध्यम असावी. |
| ३ | हिरव्या रंगाची सरकी पेंड चांगली असते. | सरकी पेंडीचा मूळ रंग हा सरकीच्या बीच्या रंगावर अवलंबून असतो, सरकी पेंडीच्या रंगावर तिची प्रत अवलंबून नसते. या उलट काही वेळा सरकी पेंडीचा रंग हिरवा करण्यासाठी कृत्रिम रंगाचा वापर केला जातो. तरी पण हिरव्या रंगाची भेसळ नसलेली सरकी पेंड नक्कीच चांगली असते परंतु सरकीचे बी जसजसे जुने होत जाते तसतसा तिचा रंग गडद होत जातो व अशा सरकी बी पासून बनवलेली पेंड गडद रंगाची तपकिरी दिसते. |
| ४ | पाण्यात घातल्यावर जास्त फुगणारी सरकी पेंड चांगली. | सरकी पेंडमध्ये असणाऱ्या कापसाच्या तंतुमुळे सरकी पेंडीमध्ये अधिक पाणी शोषले जाते व ती फुगते या निकषावर सरकी पेंडीची प्रत अवलंबून नसते. याउलट, कापसाच्या तंतुचे प्रमाण वाढल्यास प्रथिने व तेल पेंडीमध्ये कमी होत जाते ज्याची आपल्या जनावरांना जास्त गरज असते. |
| ५ | सरकी पेंड दिल्यावर इतर कोणतेही खाद्य देण्याची गरज नसते. | सरकी पेंड हे जनावरांचे पूर्णान्न नाही. त्यामुळे सर्व पौष्टीक घटकांची गरज पूर्ण होण्यासाठी चांगल्या प्रकारचे पशुखाद्य वापरुन आहार समतोल करणे गरजेचे आहे. सरकीमध्ये ग्लॉसिपॉल नावाचा विषारी घटक असतो त्यामुळे सरकी पेंडीच्या अति वापरामुळे जनावराच्या आहाराचा समतोल बिघडून दूध उत्पादन, प्रजनन संस्था व आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. |
| ६ | वर्षभर सरकी पेंड देणे गरजेचे आहे. | सरकी पेंडीचे दर हे अत्यंत अस्थिर असतात. ज्यावेळी सरकी पेंड स्वस्त होते त्यावेळी तिचा वापर करुन आहारावरील खर्च थोडा कमी करता येतो. परंतु सरकी पेंड महाग झाल्यास सरकी पेंडीऐवजी चांगल्या प्रतीचे पशुखाद्य वापरणे नेहमीच फायदेशीर ठरते. |
| ७ | सरकी पेंड खरेदी करताना तसेच वापरताना पुढील गोष्टीची दक्षता घ्यावी. | बऱ्याच ठिकाणी सरकी पेंड बनविताना फारशी काळजी घेतली जात नाही त्यामुळे सरकी पेंडीमध्ये लोखंड वा प्लास्टिकसारख्या अखाद्य वस्तू आढळतात त्यामुळे सरकी पेंड वापरताना ती काळजीपूर्वक वापरावी. सरकी पेंडीच्या लिहलेल्या वजनात व प्रत्यक्ष वजनात बऱ्याच वेळा तफावत आढळते यासाठी ग्राहकांनी वजनाची खात्री करावी. |




**बाजारात मिळणाऱ्या सरकी पेंडीविषयी :** बाजारात वेगवेगळ्या पॅकिंगमध्ये वेगवेगळ्या आकारमानाची, रंगाची, वासाची सरकी पेंड उपलब्ध असते. त्याचे दरही कमी जास्त असतात. अशावेळी ग्राहक संभ्रमात असतो की कोणती सरकी पेंड खरेदी करावी. स्वस्त प्रकारची सरकी पेंडीमध्ये विविध प्रकारची भेसळ (उदा. सरकीच्या बीवरील आवरणे, भुसा, स्वस्त प्रकारची मका चुनी, कृत्रीम रंग तसेच जवळपास मिळणारी खूप स्वस्त व जास्त वापरात नसलेली खाद्य अथवा टाकाऊ पदार्थ इ.) आढळून येते. अनेक वेळा ती ओळखणे कठीण जाते व अशी सरकी पेंड वापरुनदेखील अपेक्षित दूध उत्पादन मिळत नाही. तसेच ती जनावरांस हानिकारक असू शकते.

**वरील सर्व बाबींचा विचार करुन ३० वर्षाहून अधिक काळाच्या अनुभवाअंती तसेच तज्ञ पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली सरकी पेंडीचे निकष ठरवून त्याप्रमाणे चांगल्या प्रतीची सरकी पेंड 'हिन्दुस्तान सरकी पेंड' या नावे उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.**

**पॅकिंग व साठवणूक संबंधी सूचना :** 'हिन्दुस्तान सरकी पेंड' ४५ किलोच्या आकर्षक लॅमिनेटेड बॅगमध्ये उपलब्ध आहे. याची साठवणूक ही थेट सूर्यप्रकाशापासून दूर, थंड व कोरड्या जागेत करावी.

पशुखाद्य निर्मितीमध्ये नं.




बांधिलकी गुणवत्तेशी

हिन्दुस्तान फीड्स


**सातारा युनिट :** एल-४, ॲडिशनल एम.आय.डी.सी.,
सातारा - ४१५००४. फोन : ०२१६२-२४०४७१/२/५
ग्राहक सेवा क्रमांक : ०२१६२-२४०७७३
मोबाईल : ९०११०१२७६२
ईमेल : marketing.str@hindustanfeeds.com

**बारामती युनिट :** ई-२४८, एम.आय.डी.सी., बारामती,
पुणे - ४१३१३३
फोन : ०२११२-२४३८३४, २४३६३४, २४३६८२
ईमेल : marketing.bmt@hindustanfeeds.com

**श्रीरामपूर युनिट :**
ई-५, एम.आय.डी.सी., श्रीरामपूर, अहमदनगर - ४१३७०९
मोबाईल : ९९२२५३३३५७, ७४४७७९५७४७
ईमेल : marketing.srm@hindustanfeeds.com